समर्थ सहकारी साखर कारखाना लि,अंकुशनगर,पो.अंकुशनगर ता.अंबड जि.जालना

# ''दुष्काळी परिस्थितीत खोडवा व्यवस्थापन''

आपले कारखाना कार्यक्षेत्रात एकुण गळीतास येणारे ऊसामध्ये ४० ते ४५ % खोडावा ऊस पिकाचे क्षेत्र असते,पाणी टंचाई दुष्काळ परिस्थितीत खोडवा ऊसाचे जतन करणे शक्य आहे. खोडवा पिकाचे मुळे तयार असतात त्यामुळे ऊसाचे फुटवे लवकर फुटतात वाढ झपट्याने होते. पक्वता लवकर येते हे सर्व फायदे असतांना केवळ खोडवा पिकाकडे पाहवयाच्या उदासीनतेमुळे फार मोठे नुकसान आपण करवुन घेत आहोत. परंतु दुष्काळी परिस्थितीचा विचार करुन खोडव्याचे जतन करुन चांगले उत्पादन घेता येते.

## -: दुष्काळी परिस्थितीत खोडवा ऊसाचे अधिक उत्पादन घेण्यासाठी घ्यावयाची काळजी :-

* ऊस तुटुन गेल्यानंतर ज्या ठिकाणी जमीनीलगत ऊस तोडणी झालेली नाही,अशा ठिकाणचे बुडखे धारदार कोयत्याच्या साहय्याने जमीनीलगत तोडुन घ्यावे व त्यावर १% बावीस्टीन फवारावे त्यामुळे जमिनीलगतचे डोळ्यातुन जोमदार फुटवे वाढतात. रोग व किडीचा प्रार्दुभाव कमी होतो.
* ऊस छाटुन घेतल्यानंतर बुडख्यावरील पाचट काढुन घ्यावे पाचट जाळु नये.
* गांडुळखत व बायोअर्थ कंपोष्ट सरीमध्ये टाकावे.
* वंरब्याच्या दोन्ही बगला फोडु नयेत.सरीत पाचटाचे आच्छदान येईल याची काळजी घ्यावी.
* उपलब्ध पाण्याचा विचार करुन सरीआड सरी पाणी देणे अथवा ठिबक संच बसविणे गरजेचे आहे.
* पाचटाचे आच्छादन असल्यामुळे दिलेल्या पाण्याचे बाष्पीभवन होत नाही. जमिनीची पाणी टिकुन धरण्याची क्षमता वाढते,खोडवा ऊसाची वाढ होते.
* दुष्काळ परिस्थितीत अतिउग्र सुर्यप्रकाशामुळे ऊसाच्या हिरव्या पानातुन बाष्पीभवन होते आणि ऊस सुकतो तो टाळण्यासाठी ६% केओलीन म्हणजे ६० ग्रॅम केओलीन + एक लिटर पाणी या प्रमाणात फवारणी केल्यास खोडवा ऊसाला कमीत-कमी परिणाम होते.
* पाणी टंचाईचे काळात २ % म्युरेट ऑफ पोटॅशची फवारणी करावी.
* मे,जुन महिन्यामध्ये पावसाची चाहुल लागल्यानंतर पाचट कुजविण्यासाठी पाचटावर एकरी एक गोणी युरिया,एक गोणी सिंगल सुपर फॅास्फेट व एक लिटर पाचट कुजविणारे जिवण ,एकरी २ मे.टन शेणखत /कंपोष्टखत/किंवा बायोअर्थ कंपोष्ट मध्ये सरीत टाकावे.

अशा पध्दतीने दुष्काळी परिस्थितीत खोडवा व्यवस्थापन करुन चांगला पाऊस पडल्यावर बगला फोडणे रासायनिक खताचा वापर करुन योग्य आंतरमशागतीचा अवलंब करणे यामुळे जमिनीतील सेंद्रीय कर्बाचे प्रमाण वाढते.आणि दुष्काळात सुध्दा खोडवा पिकाची जोमदार वाढ होऊन ऊस उत्पादनात वाढ होते.

मुख्य ऊस विकास अधिकारी | कार्यकारी संचालक | व्हाईस चेअरमन | चेअरमन

व

मा.संचालक मंडळ